कराड मर्चंट

सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित, कराड

Total
Control

Total
Integration

३८ वा

वार्षिक अहवाल

२०२३-२४

माणिकराव पाटील
चेअरमन

सत्यनारायण मिणियार
अध्यक्ष, मर्चंट ग्रुप

शिवाजीराव जगताप
व्हा. चेअरमन

३८ वा वार्षिक अहवाल २०२३-२४

संचालक मंडळ २०२३-२४

सौ. अरुणा चव्हाण



सौ. राखी चव्हाण

आनंदराव शिंदे

डॉ. मुकुंद लाहोटी

नथमल ओसवाल

वसंतराव हुलवान

सुरेश पवार

डॉ. शरद क्षीरसागर

प्रकाश कारंडे

भास्कर पाटील

अरविंद शिंदे

अरविंद कलबुर्गी



किशोर झाड

राहुल मिणीयार

आकाश जाधव

सागर भोंगाळे

अशोक माटेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

बाजीराव यादव
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

भावपूर्ण

श्रध्दांजली

संस्थेचे ज्येष्ठ सभासद

• • •

स्वर्गीय रामचंद्र आण्णाजी पाटील

घोणशी

महिला मर्चंट ना. सह. पतसंस्था,
संचालक

• • •

स्वर्गीय सौ. पार्वती शिवराम पवार

ढेबेवाडी

मा. अरुण काकडेसो, जॉईन्ट रजिस्टार कोल्हापूर यांची संस्थेस सदिच्छा भेट

१ जुलै महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त माधवराव जाधव बालगृह (सुधारगृह) कराड येथे वृक्षारोपण करताना कराडचे प्रांताधिकारी श्री. अतुल म्हेत्रे साहेब, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. रियाज मुल्ला, तहसिलदार श्री. विजय पवार, गटविकास अधिकारी श्री. प्रतापराव पाटील, तालुका कृषी अधिकारी श्री. दत्तात्रय खरात, उप-निबंधक श्री. संजय जाधव व संचालक

आर्किटेक्चर श्री. मिलिंद राठी यांची संस्थेस सदिच्छा भेट

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

'कराड मर्चंट सह. क्रेडिट संस्था मर्या; कराड' ची **'३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा' मंगळवार, दि. २४/९/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता 'शताब्दी सभागृह' दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि; कराड.** हेड ऑफिस - शनिवार पेठ, कराड येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

• सभेपुढील विषय •

१) दि. १२-०९-२०२३ रोजी झालेल्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा संस्थेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल, लेखापरिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३) दि. ३१-०३-२०२४ च्या संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२३-२४ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२४-२५ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५) सन २०२३-२४ या कालावधीच्या अंतर्गत लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२३-२४ या कालावधीच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७) सन २०२२-२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
८) सन २०२४-२५ सालाकरीता अंतर्गत लेखापरीक्षकांच्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देणे.
९) सन २०२४ - २५ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१०) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
११) थकीत व बुडीत कर्जे निर्लेखित करण्यास मंजुरी देणे.
१२) थकीत कर्ज रक्कमा भरण्यासाठी व्याजात दिलेल्या सुटीस मंजुरी देणे.
१३) सन २०२३-२४ मधील संस्थेच्या शाखा करीता जागा खरेदी व बांधकाम खर्चास मंजुरी देणे.
१४) संचालक मंडळाने सूचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१५) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१६) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन,

स्थळ : कराड
दिनांक : ०६/०९/२०२४

अशोक कृष्णा माटेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

• टिप :

१) संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे संस्थेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधून सभासंदासाठी नोटीस, नोटीसबोर्डावर प्रसिध्द केली आहे.
२) संस्थेच्या सभासदांना अहवाल व हिशोबांची पत्रके याबाबत काही माहिती आवश्यक असल्यास किंवा त्यासंबधी सूचना अगर प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेपूर्वी किमान ५ दिवस अगोदर संस्थेच्या मुख्यालयात लेखी पोहोच कराव्यात.
३) कोरम अभावी (गणपूर्ती अभावी) सभा तहकूब झाल्यास सदर सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून पुर्ण करणेत येईल.
४) सभासदांनी आपली शेअर्स सर्टिफिकेटस नजीकच्या शाखेमधून घेऊन जावीत.
५) सभेस येताना सदरची नोटीस प्रत सोबत आणावी.



३८ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधु व भगिनी, नमस्कार,

अहवाल वर्ष सन २०२३-२४ हे वर्ष संस्थेसाठी अनेक बाबींचा विचार करता संस्मरणीय ठरले आहे. अहवाल वर्षात आपल्या संस्थेने ठेवी, कर्जे, कर्ज वसुली या सर्वच आघाड्यांवर ऐतिहासिक कामगिरी केली आहे. मार्च २०२४ अखेर बँकेचा व्यवसाय प्रथमच रु. ७७९ कोटीपेक्षा अधिक झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत संस्थेच्या व्यवसायामध्ये रु. ७२ कोटीची वाढ झाली आहे. तसेच सदर अहवाल वर्षात संस्थेला रु. १३ कोटी ४९ लाखांचा ढोबळ नफा व रु. ७ कोटी ९४ लाख निव्वळ नफा झाला आहे. तसेच निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०% ठेवण्यात संस्थेस यश प्राप्त झाले आहे. या सर्वांमुळेच संस्थेचे हे आर्थिक वर्ष संस्मरणीय ठरले आहे.

संस्थेने ऑनलाइन व्यवहार करणेसाठी इंटरनेट प्रणाली प्रोग्रॅम सुरु केला आहे. त्यामुळे व्यवहार करणे अत्यंत सुलभ झाले आहे. मोबाईल बँकिंग, R.T.G.S., NEFT, IMPS, UPI Net Pay, QR Code इ. सुविधा संस्थेने सुरु केल्या आहेत.

चालू आर्थिक वर्षात संस्थेच्या वडूज व उंब्रज या शाखांचे स्ववास्तूचे इमारत बांधकाम सुरु असुन तेथे अद्यावत लॉकर सुविधेसह आधुनिक सोईसुविधा उपलब्ध करून देत आहोत.

- **भागभांडवल व सभासद :**

अहवाल वर्षात संस्थेचे भागभांडवल गतवर्षापेक्षा रु. १.२३ कोटीने वाढून रु. २०.२७ कोटी इतके झाले. सभासद संख्येमध्ये ४४२४ इतकी सभासदांची वाढ झाली आहे.

२८२ सभासदांचे राजीनामे वजा जाता सभासद संख्या ३१७८९ इतकी झाली आहे.या नियमित सभासदां व्यतिरिक्त अहवाल सालातील नाममात्र सभासदांची संख्या ३९७ इतकी आहे.

- **स्वनिधी :**

भागभांडवल, राखीव निधी व इमारत निधी मिळून असलेल्या स्वनिधीची रक्कम रु. ९२.०९ कोटी इतकी झाली आहे. स्वनिधी संस्थेच्या सक्षमतेचा मापदंड असुन यातील एकसमानता व सुसंबध्द वाढ संस्थेची दमदार आणि सुदृढ आर्थिक स्थिती दर्शविते.

- **ठेवी :**

ठेवी व कर्जावरील व्याजदरांची संस्था व बँकांतर्गत असणारी स्पर्धा ही आता एक नित्याचीच बाब झाली आहे. ही गोष्ट गृहीत धरुनच बँकिंग व्यवसाय करावा लागत आहे. संस्थेतील ठेवी, मुदत संपणाऱ्या ठेवी, नूतनीकरण होणाऱ्या ठेवी, कर्ज मागणी, तरलता तसेच अन्य बँका, पतसंस्थाचे व्याजदर इ.बाबींचा तुलनात्मक विचार करून संस्थेने अवश्यकते नुसार ठेवीवरील व्याजदरात वाढ केली आहे. अहवाल वर्षात संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये ४२.२६ कोटीने वाढ झाली असुन मार्च २०२४ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी ४६३ कोटी ३१ लाख इतक्या झाल्या आहेत.

- **कर्जे :**

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनानुसार कर्जाचे एकुण ठेवीशी प्रमाण ७०% असणे आवश्यक आहे. आपल्या संस्थेने मार्च २०२४ अखेर सदरचे प्रमाण ६०% ठेवण्यात यश मिळविले आहे.

अहवाल सालात संस्थेच्या एकूण कर्जात रु. २९ कोटी ५७ लाख वाढ होऊन एकुण कर्जे ३१२ कोटी ३९ लाख इतकी झाली आहेत. कर्ज वाढीसाठी नियोजनात्मक प्रयत्न करून लहान रकमेची कर्जे वितरीत करण्याच्या दृष्टीने छोटे व्यवसायीक, मायक्रो फायनान्स विशेषतः वाहन खरेदी कर्जासाठी विशेष योजना कार्यान्वित केल्यामुळे व्यवसाय वाढीची अपेक्षित उद्दिष्टे पूर्ण करू शकलो.

- **अंतर्गत लेखापरीक्षण :**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मा.संचालक मंडळाने संस्थेचे कामकाज प्रभावी होणेचे दृष्टीने चार्टर्ड अकौटंटचे पॅनेल अंतर्गत लेखापरीक्षणासाठी नियुक्त केले आहे.त्यांचे रास्त मार्गदर्शनाने संस्थेची गुणात्मक प्रगती झाली आहे.

- **वैधानिक लेखापरिक्षण :**

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावानुसार मे. के.एम.एस.एस. ॲण्ड असोसिएट्स पार्टनर के. एल. सावंत या सनदी लेखापालांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक केली. त्यांनी लेखापरीक्षण करुन सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल अहवालातील पान नं.१३ वर सादर केलेला आहे. आपणांस सांगण्यास मला आनंद होत आहे की, लेखापरीक्षकांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता संस्थेस 'अ' वर्ग दिलेला आहे.

- **अनुत्पादित कर्जे एनपीए :**

अहवाल वर्षात वसुलीसाठी युध्द पातळीवर प्रयत्न करण्यात आले. कर्जदारांशी चर्चा, आवश्यकतेनुसार एकरक्कमी रक्कम भरुन कर्ज खाते बंद करण्याची दिलेली सवलत, पात्र कर्जदारांच्या कर्ज खात्यांचे पुनर्गठन, थकीत कर्जदारांच्या तारण मिळकतींची जप्ती, लिलाव आयोजित करून तारण मिळकतींची विक्री इ. सर्व मार्ग प्रभावीपणे वापरून अहवाल वर्षात संस्थेने चांगली वसुली केली आहे. त्यामुळेच आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये असणारे निव्वळ N.P.A. प्रमाण २.४४% वरून सन २०२३-२४ मध्ये ०% आणण्यात संस्थेस यश प्राप्त झाले आहे.

काही कर्ज खात्यांमध्ये कर्जदार निधन पावणे, नोकरी जाणे, व्यवसाय बंद होणे, गंभीर आजारी पडणे इ. अनेक कारणामुळे वसुली शक्य नसते. काही कर्जखात्यांमध्ये वसूल होण्याची शक्यता असलेल्या रकमेपेक्षा त्याच्या वसुलीसाठी वेळ व पैसा जास्त खर्च होऊ शकतो. अशी कर्जखाती निर्लेखित करून संस्थेचा नफा - तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक स्वच्छ करणेचे दृष्टीने संस्थेच्या हिताचे ठरते.

एखादे कर्जखाते निर्लेखित केले म्हणजे संस्थेने कर्ज माफ केले असा अर्थ होत नाही. संस्थेने कर्ज खाते निर्लेखित केले तरी त्याच्या वसुलीचे सर्व अधिकार संस्थेकडे कायम असतात व त्याप्रमाणे संस्था वसुलीची कारवाई सुरूच ठेवते. सदर विषयी सर्वोच्च न्यायालयाने एक प्रकरणी कर्ज खाती निर्लेखित करणेबाबत व भविष्यातील त्याच्या वसुलीबाबत अनुकूल मत व्यक्त केले आहे.

त्या अनुषंगाने आपल्या संस्थेने देखील ज्या कर्जखात्यांमध्ये वसुली शक्य नाही किंवा नजीकच्या काळातही वसुली होण्याची शक्यता नाही अशी कर्ज खाती वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेऊन निर्लेखित करण्याचा व त्यावरील नफा-तोटा पत्रकामध्ये न घेतलेले व्याज उलटविण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. अशा सर्व कर्जखात्यांची संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी छाननी करून ती निर्लेखित करण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र दिले आहे.

- **नफा वाटणी :**

सन २०२३-२४ या वर्षाअखेर आवश्यक तरतुदीची पूर्तता करून संस्थेस निव्वळ नफा रक्कम रु. ७,५४,०७,२५७.७७ इतका झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ८७२.१७ इतका आहे, असा एकूण नफ्रा रु. ७,५४,०८,१२९.९४ इतका होतो.मा.संचालक मंडळाने नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करणेस सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे त्यास मंजूरी द्यावी.

अ. नं.	तपशील	रुपये पैसे
१	राखीव निधी २५%	१,९०,००,०००.००
२	इमारत निधी	१,००,००,०००.००
३	लाभांश - ११ % (३१.०३.२०२३ चे भांडवलावर)	२,०९,५२,०००.००
४	सभासद व कर्मचारी कल्याण निधी	१५,००,०००.००
५	महोत्सव निधी	५,००,०००.००
६	संशयित व बुडीत कर्ज निधी	१,२८,१४,०००.००
७	सभासद संतोष निधी	५०,००,०००.००
८	लाभांश समिकरण निधी	२०,००,०००.००
९	आपत्ती निवारण निधी	४,२०,०००.००
१०	सेवक कल्याण निधी	५,२१,०००.००
११	तंत्र विकास निधी	१५,००,०००.००
१२	सहकार प्रशिक्षण निधी	२,००,०००.००
१३	सामाजिक उपक्रम व मदत निधी	१०,००,०००.००
		७,५४,०७,०००.००
	शिल्लक नफा	१,१२९.९४
	एकूण	७,५४,०८,१२९-९४

- **सभासद कर्मचारी कल्याण निधी :**

या योजनेअंतर्गत जे सभासद व कर्मचारी यांनी रु. ५,०००/- भरले असतील अशा व्यक्ती ठेव ठेवलेल्या तारखेपासून सहा महिन्यानंतर अनुदान मिळण्यास पात्र होतात. तरी ज्या सभासदांनी सदर योजनेत भाग घेतला नसेल त्यांनी या योजनेचे सभासद होऊन मिळणाऱ्या वैद्यकीय अनुदानाचा लाभ घ्यावा.

• वैद्यकिय अनुदान तक्ता :

अ. नं.	वैद्यकिय अनुदान तक्ता	अनुदान
१	लॅबोरेटरी चार्जेस- रक्त तपासणी	५,०००
२	लॅबोरेटरी चार्जेस- लघवी तपासणी	१००
३	एक्स - रे	७००
४	E C G	२००
५	चष्मा खरेदी	१,५००
६	डिलीव्हरी नॉर्मल	३,०००
७	सी.टी.स्कॅन	२,५००
८	एम.आर.आय.	४,०००
९	सोनोग्राफी	१,५००
१०	दंत उपचार	५,०००
११	मायनर ऑपरेशन	१५,०००
१२	मिडीयम ऑपरेशन	२०,०००
१३	मेजर ऑपरेशन	५०,०००
१४	एंजोग्राफी	७,०००
१५	कॅन्सर उपचार (ऑपरेशन व ट्रिटमेंट)	५०,०००
१६	अँजीओप्लास्टी	२५,०००
१७	हॉस्पिटल चार्जेस	१०,०००
१८	मुत्र व किडनीचे विकार	२०,०००

• नियम व अटी :

१) सभासद व कर्मचारी कल्याण ठेव रू. ५,०००/- राहील. (जुन्या सभासदांचे रू. ५,०००/- पूर्ण करुन घेणे).
२) नवीन सभासदांना प्रवेश फी ५००/-
३) अनुदानाची जास्तीत जास्त मर्यादा उपभोगले नंतर ठेव पुन्हा घेणे. (५०,०००/- अनुदान घेतले नंतर).
४) सदर अनुदान रू. ५०,०००/- पर्यंत मर्यादित राहील.
५) सदर ठेवीचे व्याज सभासद व कर्मचारी कल्याण निधीस जमा राहील.
६) सभासद मृत्यु पावलेनंतर सदर ठेव निधीस वर्ग होईल.
७) रू. ५,०००/- भरुन वर्ष पूर्ण झाले नंतर रिनीव्हल फी म्हणून दरवर्षी रू. ४००/- भरुन घेणेत येईल.
८) अनुदान मागणीचे बील त्या-त्या महिन्यातील असावे.
९) अनुदान मिळणेसाठी सभासदांचे संस्थेत ठेव रू. १०,०००/- व व्यवहार असणे आवश्यक.
१०) सदरचे अनुदान वर्षातून एकदाच मिळेल.

- **संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जाबाबत :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कायदा कलम ७५ (२) मधील तरतूदी नुसार अहवाल सालात संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कर्जाची माहिती पुढील प्रमाणे :

तपशील	वर्षाचे सुरुवातीस येणे कर्ज रक्कम	अहवाल वर्षात वाढ झालेली कर्जे	अहवाल वर्षात फेड झालेली कर्जे	अहवाल साल अखेर शिल्लक	थकबाकी
संचालक कर्जे	३,५८,७४,९७१	७,३८,८४,५७८	१,८८,७५,१७६	९,०८,८४,३७३	नाही
नातेवाईक कर्जे	१,००,०४,१४६	३०,४७,८६१	७७,९५,४५०	५२,५६,५५७	नाही
एकूण	४,५८,७९,११७	७,६९,३२,४३९	२,६६,७०,६२६	९,६१,४०,९३०	नाही

- **संचालक मंडळ सभा :**

सन २०२३-२४ मध्ये संचालक मंडळाच्या एकूण ४९ सभा झाल्या असून सर्व निर्णय बहुमतांने घेण्यात आले आहेत.

- **वार्षिक सर्वसाधारण सभा :**

संस्थेची सन २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१२/०९/२०२३ रोजी खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सदर सभेस एकूण ६५७ सभासद हजर होते. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना अध्यक्ष महोदयांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले आहे.

- **सामाजिक कार्य :**

तीव्र बँकिंग स्पर्धा, नवनवीन तंत्रज्ञान, त्यासाठीची मोठी आर्थिक गुंतवणूक व सेवक अधिकाऱ्यांचे ज्ञान इ. बाबीमुळे लहान सहकारी संस्थाना कामकाज करणे दिवसेंदिवस अवघड होत आहे. अनेक वर्ष नागरी सहकारी क्षेत्रात आपली संस्था कार्यरत असल्यामुळे या क्षेत्रासाठी जेष्ठत्वाची जबाबदारी आपल्या संस्थेस प्राप्त झाली आहे. त्यामुळेच अशा प्रकारे अडचणीत असलेल्या सहकारी संस्थाना आपल्या संस्थेने सहकाराचे मुळ तत्व सांभाळून कायमच मार्गदर्शन केले आहे, सहाय्य केले आहे आणि त्या अनुषंगाने चालु आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील बऱ्याच संस्थांनी आपल्या संस्थेस भेटी देऊन कामकाजाचा अभ्यास करून त्याप्रमाणे त्याची अमंलबजावणी आपआपल्या संस्थेत करणेस सुरुवात केली आहे.

सहकार क्षेत्रात कार्यरत असताना आपली संस्था सामाजिक उपक्रमातही प्रत्येक वर्षी अग्रेसर असते. चालु आर्थिक वर्षात संस्थेने कराड येथील माधवराव जाधव बालगृह (सुधारगृह), कराड मधील शाळेच्या खोल्या बांधणेस मर्चंट समूहाकडून रक्कम रु.११ लाख रुपये देणगी देऊन आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. तसेच क्रिडा क्षेत्रातुन उत्कृष्ट खेळाडू घडावे या उद्देशाने कराडच्या लिबर्टी मजदूर मंडळास क्रिडा साहीत्य खरेदी करणेसाठी मर्चंट समूहाकडून ७ लाख ५१ हजार रुपये देणगी दिली आहे.

- **महिला दिन :**

दि. ८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. दि. १ मार्च ते १० मार्च या कालावधीत महिला दिन साजरा केला गेला. 'जागतिक महिला' दिनानिमित्त संस्थेच्या शाखांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करून महिलांचे कलागुणांना वाव देणेचा प्रयत्न करणेत आला.

- **सेवक वर्ग :**

संस्थेतील सर्व आधिकारी व इतर सर्व सेवकांचे परस्परांशी व व्यवस्थापनाशी असलेले संबंध नेहमीच सौहार्दपूर्ण राहीले आहेत. त्यांनी ठेवी गोळा करणेबरोबर वसुली मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहकार्य देऊन समाधानकारक काम केले आहे, हे अभिमान पूर्वक नमूद करावेसे वाटते.

आर्थिक वर्षामध्ये संस्थेचा प्रतिसेवक व्यवसाय ९ कोटी ९८ लाख झाला आहे.

- **भेटी :**

अहवाल सालात संस्थेस मा. श्री. अरुण काकडे साहेब जॉइंट रजिस्ट्रार, कोल्हापूर, श्री. जे. पी. शिंदे साहेब, उप निबंधक, सातारा व **IAS** ऑफिसर श्री. सचिन जाधव यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या सर्व उपक्रमांची माहिती घेऊन व्यवसायवाढीसाठी नवनवीन संकल्पना सुचविल्या.

तसेच महाराष्ट्रतील नागरी सह.पतसंस्था सुध्दा आपल्या संस्थेस अभ्यास दौऱ्यासाठी भेटी देत असतात आर्थिक वर्षात संग्राम नागरी सहकारी पतसंस्था संगमनेरचे अधिकारी व कर्मचारी यांनी भेट देऊन आपल्या येथील कामकाजाचा अभ्यास केला.

- **भावपूर्ण श्रद्धांजली :**

अहवाल सालात काही सभासद, थोर नेते, शास्त्रज्ञ, डॉक्टर, समाज सुधारक, सैनिक, पोलीस कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, सफाई कामगार, हितचिंतक, सेवक त्यांचे कुटुंबीय अशा ज्ञात-अज्ञात व्यक्ती दिवंगत झाल्या. त्या सर्वांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून 'भावपूर्ण श्रध्दांजली'!

- **आभार :**

संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, कायदेशीर सल्लागार, व्हॅल्युअर्स, इन्शुरन्स कंपनीचे पदाधिकारी व त्यांचे सहकारी, ऑडिटर्स तसेच सहकार खात्यामधील सर्व अधिकारी व सेवक वर्ग विविध राजकीय प्रतिष्ठीत व्यक्ती, सहकारी संस्थांचे, बँकाचे अधिकारी वर्ग व संस्थेतील सेवक वर्ग संस्थेच्या उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी व मुख्यत्वे माझे सर्व सहकारी संचालक मंडळ, शाखा समिती सदस्य यांनी आपला अमूल्य वेळ देऊन संस्थेस मार्गदर्शन करून संस्था वाढीस अनमोल सहकार्य केले, आणि त्यामुळेच संस्थेचा आर्थिक पाया भक्कम झाला असून यापुढे संस्थेस प्रगतीची/व्यवसायवाढीची अनेक दालने खुली होतील हे मात्र नक्की. आपणा सर्वांचे आभार...

धन्यवाद !

जय सहकार ! जय महाराष्ट्र !!

आपला सहकारी

माणिकराव रामचंद्र पाटील
चेअरमन

दि. ३१/३/२०२४ चे

भांडवल व देणी	३१-३-२०२३ रुपये पैसे	३१-३-२०२४ रुपये पैसे
भांडवल		
अधिकृत भागभांडवल	२५,००,००,०००.००	२५,००,००,०००.००
वसूल भागभांडवल	१९,०४,५५,४७५.००	२०,२७,८२,४५०.००
निधी		
राखीव निधी	१९,६१,६३,३६३.००	२१,१५,६०,८५२.००
इमारत निधी	१०,५०,७७,४९५.००	१०,६५,८७,४७५.००
लाभांश समीकरण निधी	३०,०२,३९७.००	३५,०२,७४४.००
संशयित व बुडीत कर्जनिधी (NPA)	३४,७०,०३,०६३.००	४०,२५,९७,४७२.००
संशयित व बुडीत गुंतवणूक निधी	१९,४०,६२,७११.००	१९,३८,१२,७११.००
सभासद कल्याण निधी	१,२७,९१,२९७.००	१,३१,०२,८७३.००
थकबाकी व्याज निधी	१,६०,००,०००.००	१,७०,००,०००.००
गुंतवणूक चढ उतार निधी	२५,००,०००.००	३०,००,०००.००
उत्पन्नक्षम कर्ज तरतूद	७०,००,०००.००	७५,००,०००.००
सभासद संतोष निधी	१,११,००,०००.००	१,२१,००,०००.००
महोत्सव निधी	६४,०१,०००.००	६१,६८,०००.००
आपत्ती निवारण निधी	११,८०,०००.००	१३,८०,०००.००
सेवक आरोग्य आणि कल्याणनिधी	१३,८४,०००.००	२२,८४,०००.००
ठेवी	४२१,०५,१२,४९४.२३	४६३,३१,१७,७६९.११
देणे व्याज	१४,४९,४१,०५७.००	१६,४१,८०,३९६.५०
इतर देणी	१,६८,५३,९५१.७१	२,३५,७०,१५१.७१
अनामत	७,६१,२२५.००	७४,१६५.००
ओव्हर ड्राफ्ट	३,९९,६५,७३९.५४	३,६१,३९,९४८.२४
थकव्याज - निधी (दुबेरजी)	९,४१,७२,३९६.५०	८,७०,७६,५०९.७५
	५६०,१३,२७,६६४.९८	६१२,७५,३७,५१७.३१
नफा		
गत सालचा नफा	१०७८.४१	८७२.१७
चालू सालचा नफा	५,७७,४५,७९३.७६	७,५४,०७,२५७.७७
एकूण	**५६५,९०,७४,५३७.१५**	**६२०,२९,४५,६४७.२५**

तपासले बरोबर आहे आमचे सोबतचे अहवालास अनुसरुन

मे. के एम एस एस ॲण्ड असोसिएट्स
सरकारी लेखापरिक्षक

मे. पी. एल. कुलकर्णी आणि कंपनी, कराड
अंतर्गत लेखापरिक्षक

सत्यनारायण मिणीयार
मर्चंट ग्रुप, अध्यक्ष

माणिकराव पाटील
चेअरमन

शिवाजीराव जगताप
व्हा. चेअरमन

अशोक माटेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

ताळेबंद पत्रक

मालमत्ता व येणी	३१-३-२०२३ रूपये पैसे	३१-३-२०२४ रूपये पैसे
शिल्लक		
हातावरील रोख शिल्लक	१,६८,७३,१६७.०९	२,४६,४९,९४१.९४
बँक खातेवरील शिल्लक	६,७५,०१,२१४.१९	११,९०,८६,२९१.६०
गुंतवणूक	२५७,०२,६३,४२३.५६	२७४,८६,०३,६३२.९२
कर्जे	२८२,८१,३७,३८२.९७	३१२,३८,८३,६७७.१७
कायम मालमत्ता	१,१२,१५,९२९.२४	१,४०,२१,८३६.८४
स्थावर मिळकत	२,८०,७१,७२९.००	४,१७,३९,७१९.६६
इतर येणी	४,२८,३९,२९४.६०	४,३८,८४,०३७.३७
थकव्याज-निधी (दुबेरजी)	९,४१,७२,३९६.५०	८,७०,७६,५०९.७५
एकूण	**५१४,६४,२८,८६०.४२**	**६२०,२९,४५,६४७.२५**

❊ संचालक मंडळ ❊

डॉ. मुकुंद लाहोटी
अरविंद कलबुर्गी
प्रकाश कारंडे
आनंदराव शिंदे

नथमल ओसवाल
राहुल मिणीयार
आकाश जाधव
किशोर झाड

सुरेश पवार
भास्कर पाटील
अरविंद शिंदे
सौ. अरूणा चव्हाण

वसंतराव हुलवान
डॉ. शरद क्षीरसागर
सागर भोंगाळे
सौ. राखी चव्हाण

दि. १-४-२०२३ ते दि. ३१-३-२०२४

खर्च	३१-३-२०२३ रुपये पैसे	३१-३-२०२४ रुपये पैसे
दिलेले व्याज	२९,०४,१३,४९९.०५	३२,६९,३७,००९.६०
पगार	५,९७,५८,००८.००	७,१६,८०,६२०.००
भाडे,कर,विमा,लाईट इ.	५३,५२,४८७.३७	५३,८४,७८०.४१
छपाई व स्टेशनरी	१३,६७,९०२.१४	१७,८०,१४५.७२
पोस्टेज व टेलिफफ्रोन	३,७१,६१७.०४	४,०५,६७५.२२
इतर खर्च	१,४४,६९,२२९.५४	१,६९,०४,५८२.८१
तरतुदी		
संशयीत व बुडीत कर्ज	१,९४,४८,०३५.००	३,६५,००,०००.००
थकव्याज	५,००,०००.००	१०,००,०००.००
उत्पन्नक्षम कर्ज तरतूद	५,००,०००.००	५,००,०००.००
गुंतवणूक चढ उतार निधी	०.००	५,००,०००.००
नफा ताळेबंदाकडे वर्ग	५,७७,४५,७९३.७६	७,५४,०७,२५७.७७
एकूण	**४४,९९,२६,५७१.९०**	**५३,७०,००,०७१.५३**

तपासले बरोबर आहे आमचे सोबतचे अहवालास अनुसरुन

मे. के एम एस एस ॲण्ड असोसिएट्स
सरकारी लेखापरिक्षक

मे. पी. एल. कुलकर्णी आणि कंपनी, कराड
अंतर्गत लेखापरिक्षक

सत्यनारायण मिणीयार
मर्चंट ग्रुप, अध्यक्ष

माणिकराव पाटील
चेअरमन

शिवाजीराव जगताप
व्हा. चेअरमन

अशोक माटेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

अखेर वर्षाचे नफातोटा पत्रक

उत्पन्न	३१-३-२०२३ रुपये पैसे	३१-३-२०२४ रुपये पैसे
मिळालेले व्याज	४४,६५,८४,३८६.५५	५२,८४,७५,१४१.४०
इतर जमा	३३,४२,१८५.३५	८५,२४,९३०.१३
एकूण	**४४,९९,२६,५७१.९०**	**५३,७०,००,०७१.५३**

✲ संचालक मंडळ ✲

डॉ. मुकुंद लाहोटी
अरविंद कलबुर्गी
प्रकाश कारंडे
आनंदराव शिंदे

नथमल ओसवाल
राहुल मिणीयार
आकाश जाधव
किशोर झाड

सुरेश पवार
भास्कर पाटील
अरविंद शिंदे
सौ. अरुणा चव्हाण

वसंतराव हुलवान
डॉ. शरद क्षीरसागर
सागर भोंगाळे
सौ. राखी चव्हाण

अंतर्गत लेखापरिक्षकाचा अहवाल

आम्ही, **कराड मर्चंट सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित,कराड** या संस्थेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१ मार्च २०२४ या वर्षाच्या ताळेबंदाचे व त्याच दिनांकाचे नफा-तोटा पत्रक तपासले आहे.

या संस्थेच्या हेड ऑफिस व १ शाखेचे अंतर्गत ऑडीट आम्ही केले असून याशिवाय अन्य शाखांचे कंकरंट व अंतर्गत ऑडीट संस्थेने नेमलेल्या अन्य चार्टर्ड अकौटंट यांनी केले आहे.

ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक तयार करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. अशा हिशेबी पत्रकावर अंतर्गत लेखापरीक्षणाच्या आधारे मत व्यक्त करण्याची आमची जबाबदारी आहे.

आम्ही भारतात जी ऑडीटींग स्टँडर्ड साधारणत: मान्य करण्यात आलेली आहेत. त्यास अनुसरून संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षण केले आहे. अशा ऑडीटींग स्टँडर्डनुसार अंतर्गत लेखापरीक्षणाचे नियोजन करुन अंतर्गत लेखापरिक्षण करावयाचे असते. अशा अंतर्गत लेखापरिक्षणात आर्थिक पत्रके चुकीची माहिती दर्शविणार नाहीत याबाबत पुरेशी सावधानता घेण्यात येते. अशा अंतर्गत लेखापरिक्षणात आर्थिक पत्रकात व परिशिष्टात दर्शविलेल्या रकमा बरोबर आहेत का याची खात्री करण्यासाठी आवश्यक तो पुरावा चाचणी पद्धतीने पडताळणी करणे याचा समावेश होतो. त्याचप्रमाणे अंतर्गत लेखापरिक्षणात व्यवस्थापनाने तयार केलेली हिशेबाची तत्वे आणि सिग्निफिकंट एस्टिमेटस याचे मुल्यांकन करणे त्याचबरोबर आर्थिक पत्रकाचे मूल्यमापन करणे याचा समावेश आहे. आम्हांस विश्वास वाटतो की, आम्ही केलेले अंतर्गत लेखापरिक्षण हे आमचे मत व्यक्त करण्यास आधारभूत बाब आहे.

अंतर्गत लेखापरिक्षण अहवालामधील शेरे व सुचनास पात्र राहून आम्ही अहवाल करतो की,

१) आमच्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाने जरूर ती माहिती व खुलासे आम्हांस उपलब्ध झाले असून ती सर्व महिती व खुलासे समाधानकारक आहेत.

२) आमच्या मते पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व पोटनियमांनी अपेक्षित असलेप्रमाणे योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेला एकत्रित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणांशी जुळत आहे.

४) आमचे मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हांला प्राप्त झालेल्या संस्थेच्या इतर शाखांच्या अंतर्गत / कंकरंट तपासनीसाठी तपासलेल्या हिशोब पत्रकानुसार तसेच आम्हांस देण्यात आलेल्या खुलाशावरून हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहिती देतात.

५) ताळेबंद पत्रकात दिनांक ३१/०३/२०२४ या दिवशीच्या संस्थेच्या परिस्थितीची व नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

मे. पी. एल. कुलकर्णी आणि कंपनी,
चार्टर्ड अकौंटन्टस्, कराड

स्थळ : कराड
दिनांक : ०४/०७/२०२४

(सीए. पी. एल. कुलकर्णी)
प्रोप्रायटर
अंतर्गत लेखापरीक्षक   मे.नं. ०११५१९

नमुना 'एन २'
(कलम ८१ आणि नियम ६९ (३) पहा)

प्रति,
मा. अध्यक्षसो/व्यवस्थापकसो,
कराड मर्चंट सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित, कराड
ता. कराड, जि. सातारा.

संदर्भ : नियुक्ती पत्र / वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १२/०९/२०२३ ठराव क्र. ०९ नुसार

वैधानिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणांचा अहवाल

१. कराड मर्चंट सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित, कराड यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०२४ पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंतचे केले आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राबाबतची जबाबदारी

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

लेखापरिक्षकाची जबाबदारी

३. केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापारिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतीतत्त्वाच्या पालनाची जरुरी आहे व ती आम्ही पाळली आहे. आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळविण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४. लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे. व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर, आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५. लेखापारीक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

अभिप्राय

६. आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे. आमचे स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल भाग क्र. अ, ब, व क, मधील शेऱ्यांस पात्र राहून

१. ताळेबंदाचे बाबतीत दिनांक ३१ मार्च २०२४ ची संस्थेची सांपत्तिक स्थिती

२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत, त्या दिनांकास संपणाऱ्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात

इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद्पत्रक व नफा - तोटा विवरणपत्रके तयार केलेली आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की,

अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार जे आमच्या लेखापरीक्षणासाठी जरूर आहे. ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहे.

९. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक व नफा तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहेत.

१०. आम्ही आणखी पुढील अहवाल करतो

१. या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२. आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके, जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत, ती सर्व व्यवस्थित आहेत.

३. लेखापरिक्षण केलेल्या वर्षासाठी संस्थेस 'अ' वर्ग प्रदान करण्यात आलेला आहे.

स्थळ : कराड
दिनांक : ३०/०७/२०२४

मे. के एम एस एस ॲण्ड असोसिएट्स
चार्टर्ड अकौंटंट्स करीता

(सीए. के. एल. सावंत)
सहकार लेखापरिक्षक तालिका क्रमांक -१०१८३४६
UDIN - 24036414BKFTJX6032

सन २०२४-२५ सालाकरिता सुचविलेले उत्पन्नाचे अंदाजपत्रक

तपशील	सन २०२३-२४ सालाचे अंदाजपत्रक	सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष उत्पन्न	वाढ	घट	सन २०२४-२५ सालाचे अंदाजपत्रक
मिळालेले व्याज	४९,००,००,०००	५२,८४,७५,१४२	३,८४,७५,१४२	------	५८,००,००,०००
इतर उत्पन्न	३७,००,०००	८५,२४,९३०	४८,२४,९३०	------	९०,००,०००
एकूण	४९,३७,००,०००	५३,७०,००,०७२	४,३३,००,०७२	------	५८,९०,००,०००

सन २०२४-२५ सालाकरिता सुचविलेले खर्चाचे अंदाजपत्रक

तपशील	सन २०२३-२४ सालाचे अंदाजपत्रक	सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च	वाढ	घट	सन २०२४-२५ सालाचे अंदाजपत्रक
दिलेले व्याज	३२,००,००,०००	३२,६९,३७,०१०	६९,३७,०१०		३६,००,००,०००
पगार	६,५८,००,०००	७,१६,८०,६२०	५८,८०,६२०	------	८,००,००,०००
भाडे, कर, विमा, लाईट इ.	५९,००,०००	५३,८४,७८०	------	५,१५,२२०	६०,००,०००
छपाई व स्टेशनरी	१५,००,०००	१७,८०,१४६	२,८०,१४६	------	१९,५०,०००
पोस्टेज व टेलिफोन	४,१०,०००	४,०५,६७५	------	४,३२५	४,५०,०००
इतर खर्च	१,६०,००,०००	१,६९,०४,५८३	९,०४,५८३	------	१,८५,००,०००
संश. व बुडीत कर्ज तरतूद	२,१०,००,०००	३,६५,००,०००	१,५५,००,०००	------	४,००,००,०००
गुंतवणूक चढ-उतार तरतूद	५,००,०००	५,००,०००	------	------	५,००,०००
थकव्याज तरतूद	१०,००,०००	१०,००,०००	------	------	१०,००,०००
उत्पन्नक्षम कर्ज तरतूद	१०,००,०००	५,००,०००	------	५,००,०००	१०,००,०००
आपत्ती निवारण निधी तरतूद	२,००,०००	------	------	२,००,०००	५,००,०००
अपेक्षित नफा	६,०३,९०,०००	७,५४,०७,२५८	१,५०,१७,२५८	------	७,९१,००,०००
एकूण	४९,३७,००,०००	५३,७०,००,०७२	४,४५,१९,६१७	१२,१९,५४५	५८,९०,००,०००

- **RTGS, NEFT, IMPS** या ॲपने देशातील कोणत्याही बँकेत पैसे पाठविण्याची व मागविणेची सुविधा
- **CBS** प्रणाली अंतर्गत **SMS** बँकिंग, **MOBILE** बँकिंग, **QR Code**, **Miss Call Alert**, **DTH Recharge**, **Mobile Recharge, BSNL, Airtel, Landline bill pay**
- **पॅन कार्ड काढून मिळणेची सुविधा.**
- **बालविद्या ठेव योजना -** लहान मुलांना बचतीची सवय लागावी म्हणून
- **स्त्रीधन ठेव योजना -** गृहीणीकरीता काटकसरीतून साठवलेल्या पैश्यांसाठी
- **युवा नेक्स्ट -** खास तरुणाईसाठी बचतीचा नवा आनंद देणारी योजना
- **ज्येष्ठ नागरिक पेन्शन सेव्हिंग्ज ठेव योजना -** ९% व्याजदर
- **स्मार्ट सेव्हींग्ज ठेव योजना -** ९% व्याजदर

Total Control..
Total Integration!

करा़ड मर्चंट
सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित, कराड

पोट नियम दुरुस्तीचा मसुदा

अ. नं.	पोटनियम क्र.	सध्याच्या पोटनियमांची शब्द रचना	दुरुस्ती नंतरची शब्दरचना	दुरुस्तीचे कारण
१	५९	**भागभांडवलाचे कर्जाशी प्रमाण :** कर्जदार सभासदांसाठी भागभांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील. १) विनातारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या ५%पर्यंत. २) तारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या २.५% पर्यंत तथापी कोणत्याही सभासदाला संस्थेच्या भागभांडवलाच्या १/५ किंवा जास्तीतजास्त रु. २ लाख या पैकी जी कमी असेल ती रक्कम भागभांडवल म्हणून घेता येईल. तथापी सहकार खात्याने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहील.	**भागभांडवलाचे कर्जाशी प्रमाण :** कर्जदार सभासदांसाठी भागभांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील. १) विनातारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या ५%पर्यंत. २) तारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या २.५% पर्यंत तथापी कोणत्याही सभासदाला संस्थेच्या भागभांडवलाच्या १/५ किंवा जास्तीतजास्त रु. ५ लाख या पैकी जी कमी असेल ती रक्कम भागभांडवल म्हणून घेता येईल. तथापी सहकार खात्याने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहील.	शासन परिपत्रक जा.क्र.ना.पत/स आ ५/वैयक्तिक भागधारण मर्यादा ५लाख/१४८४/२०२४ दि. २० मे २०२४ चे सूचनेप्रमाणे.
२	२१(१)	**संचालक मंडळ निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क :** १) फक्त क्रियाशील सभासदांना त्यांचे भागांची संख्या कितीही असली तरी एक मत देण्याच्या हक्क राहील.	**संचालक मंडळ निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क :** १) फक्त क्रियाशील सभासदांना त्यांचे भागांची संख्या किमान २५ असेल तरच एक मत देण्याच्या हक्क राहील.	संस्था हिताच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने
३	४५(३)	**संचालक म्हणुन निवडणूक लढविण्यास पात्रता :** **नवीन**	सभासदांने संस्थेचे भागांची संख्या किमान २५० इतकी धारण केली असली पाहिजे	संस्था हिताच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने

• संस्थेची वाटचाल •

तपशील	२०२०	२०२१	२०२२	२०२३	२०२४
सभासद संख्या	२०२०६	२१२७१	२२३३०	२७६४४	३१७८५
वसूल भांगभांडवल	१५,६५,७०,७००	१६,७२,३७,६२५	१७,६९,९६,३५०	१९,०४,५५,४७५	२०,२७,८२,४५०
राखीव निधी	१४,५६,३४,८४७	१६,१७,५८,२११	१७,९६,०४,८०८	१९,६१,६३,३६३	२१,१५,६०,८५२
इतर निधी	५३,९२,१७,३१६	६१,५७,७२,९४३	६६,४१,८१,८७७	७०,७५,०१,९६३	७६,९०,३५,२७५
ठेवी	३४६,०८,३४,५८४	३६३,३८,५४,६९४	३८१,९७,५४,६६७	४२१,०५,१२,४९४	४६३,३१,१७,७६९
कर्जे	२३५,५०,८३,०१७	२६६,१०,८४,९७०	२६८,४९,५६,६६८	२८२,८१,३७,३८२	३१२,३८,८३,६७७
गुतंवणूक	२०१,२२,७३,६९०	२०१,४९,२९,७३९	२१७,५६,४७,२९९	२५७,०२,६३,४२३	२७४,८६,०३,६३३
थकबाकी मुदत संपलेली	२२,३७,३६,२८०	२३,५८,०३,२५५	३२,३२,७८,७३५	२८,४४,७७,४९६	३४,८४,११,६४५
थकबाकी शे.प्रमाण	९.५०%	८.८७%	१२.०४%	१०.०५%	११.१५%
निव्वळ एन.पी.ए. प्रमाण	४.८५%	०.४८%	४.६९%	२.४४%	०.००%
निव्वळ नफ्रा	५,७०,१६,२२३	६,२७,२८,६६२	५,२१,७१,३२६	५,७७,४५,७९३	७,५४,०७,२५८
खेळते भांडवल	४५०,४४,९४,४४४	४८२,११,११,७४६	५०४,४७,९४,४१५	५५६,४९,०२,१४१	६११,५८,६९,१३७
ऑडीट वर्ग	अ	अ	अ	अ	अ
शाखा - मुख्यालयसह	२८	२८	२८	२८	२८
लाभांश	१०	१०	१०	१०	११

शाखा उंब्रज भूमिपूजन प्रसंगी संस्थेचे सभासद श्री. विजय चव्हाण व संचालक मंडळ

शाखा वडूज भूमिपूजन प्रसंगी संस्थेचे संचालक श्री. सुरेश पवार व सभासद

संग्राम नागरी सहकारी पतसंस्था, संगमनेर येथील संचालक मंडळाची संस्थेस अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट

माधवराव जाधव बालगृह (सुधारगृह) कराड यांना शाळेच्या खोल्या बांधकामासाठी रू. ११ लाख देणगी दिली त्या शाळेची सुसज्ज इमारत

लिबर्टी मजदूर मंडळ, कराड यांना ७ लाख ५१ हजार रूपये देणगीचा धनादेश प्रदान करताना मर्चंट कुटुंब प्रमुख मा. मिणीयार साहेब व संचालक

'फळांचे गांव' धुमाळवाडी, ता. फलटण येथे अभ्यास दौऱ्या प्रसंगी संस्थेचे चेअरमन श्री. माणिकराव पाटील, संचालक मंडळ व सभासद

संस्थेच्या शाखा शिरवळ येथील नूतन वास्तूप्रवेश समारंभा प्रसंगी मर्चंट कुटुंब प्रमुख, संचालक मंडळ व सेवक वर्ग

'सुविचार संग्रह' भाग २ पुस्तक प्रकाशन समारंभ

शाखा वडूज नूतन वास्तू

शाखा उंब्रज नूतन वास्तू

प्रकाशक : **माणिकराव पाटील** - चेअरमन

कराड मर्चंट सहकारी क्रेडिट संस्था मर्या; कराड

७, ८, सोमवार पेठ, कराड - ४१५ ११०.
फोन : (०२१६४) २२३६७८, २२०१५५ ▪ मेल : karadmerchant@yahoo.com

मुद्रक : **प्रीतिसंगम मुद्रणालय**

२३३, शनिवार पेठ, सुर्या कॉम्प्लेक्स,
दत्त चौक, कराड - ४१५ ११०.
मोबा.: ८३८०००९१८१ ▪ मेल : priti83800@gmail.com